# प्रकरण चौथे

## "स्त्रियांचे बाबतीतील सामाजिक अधिकार व धार्मिक नियम."

"स्त्रीबालादयः असाक्षिणः"

§या.स्मृ.2.5.70§

"सत्यामन्यां सवर्णायां धर्मकार्यं न कारयेत् ।
सवर्णासु विधौ धर्म्ये ज्येष्ठ्या न विनेतरा ।।"

§या.स्मृ.1.3.88§

## प्रकरण चौथे

## स्त्रियांचे बाबतीतील सामाजिक अधिकार व धार्मिक नियम·

स्मार्त वाङ्‌मयाच्या काळात समाजातील विविध घटकांच्या हक्क आणि कर्तव्यांचा विशेषत्त्वाने विचार करण्यात आलेला दिसतो· स्त्री वर्ग समाजाचा मोठा भाग असल्याने स्त्रियांना कोणते अधिकार दिले पाहिजेत· कोणती कर्तव्ये करणे भाग पाडले पाहिजे याचा मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती यांनी अतिशय गंभीरपणे विचार केलेला आढळतो· या विषयाच्या बाबतीतील याज्ञवल्क्यस्मृतीची मते पुढीलप्रमाणे नोंदविता येतील·

गृहस्थधर्म प्रकरणामध्ये गृहस्थाने आचरणात आणावयाच्या नियमांचे विवेचन केले आहे· त्याप्रसंगी याज्ञवल्क्यस्मृतीने म्हटले आहे की, बालक इ· सुवासिनी म्हणजे विवाहानंतर पित्याच्या घरी राहिलेली कन्या, गर्भवती, कुमारिका यांना प्रथम जेवावयास घालून नंतर राहिलेले अन्न गृहस्थ व त्याच्या पत्नीने खावे·"[1]

याज्ञवल्क्याने सांगितलेला हा गृहस्थधर्म कोणत्याही गृहस्थाने लक्षात घेण्याजोगा आहे· विवाहानंतर काही कारणास्तव वडिलांच्या घरी आलेल्या कन्येला, गर्भवती स्त्रीची लक्षात घेऊन गर्भपोषणासाठी आणि तिच्या प्रकृतिस्वास्थ्यासाठी गर्भवतीला, घरातील मुलीला या सर्वांना गृहस्थाने खाऊन शिल्लक राहिलेले, शिळे किंवा कदान्न न देता आपण स्वतः जेवण्यापूर्वी यांना व्यवस्थित भोजन द्यावे हे याज्ञवल्क्यस्मृतीचे मत जरूर आदरणीय आहे·

गृहस्थाने भोजनाच्या वेळसे आलेल्या मातेकडील बांधवांना भोजन घालावे[2], असेही सांगितले आहे· केवळ आईच नव्हे तर आईकडील कोणीही आल्यास गृहस्थाने त्यांचे भोजनाच्याद्वारे आदरातिथ्य करावे, हा या वचनातील भावार्थ आहे·

वृद्ध, ओझे घेतलेला इ·च्या बरोबर स्त्रीला रस्त्यातून जाण्यासाठी मार्ग द्यावा[3], याज्ञवल्क्यस्मृतीच्या या मतामध्ये स्त्री दाक्षिण्याचा भाव सूचित झाला आहे·

शूद्राचा "भार्यारति" हा धर्म सांगितला आहे.[4] याचा अर्थ त्याने वेश्यागमन किंवा परस्त्रीगमन केव्हाही करू नये, शूद्राने आपल्या पत्नीशिवाय इतर स्त्रियांचा विचार करू नये, वेश्यागमनासारख्या क्षुद्र वृत्तीचा अवलंब त्याने करू नये. त्याने पत्नीनिष्ठा धारण करावी असे या नियमावरून दिसते.

स्नातकधर्म प्रकरणामध्ये स्तानकाचे धर्म सांगत असताना "न भार्यादर्शने अश्नीयात्"[5] असे म्हटले आहे. भार्या समोर असताना जेऊ नये. याचे कारण सांगत असताना "भार्येच्या समोर बसून भोजन केल्यास वीर्यशून्य संतती होते." हे श्रुतिमधील वचन उद्धृत केले आहे.

स्नातकाने देवमूर्ती, ऋत्विज इ. बरोबरच परस्त्रीच्या छायेचे उल्लंघन करू नये.[6] त्याने स्वर्ग न देणारे व लोकांनी निंद्य मानलेले धर्मकृत्य म्हणजे शास्त्रविहित कर्म करू नये. उदाहरणादाखल ही कर्मे कोणती त्याचे स्पष्टीकरण मिताक्षरेमध्ये असे दिले आहे- "विधवानियोग, ब्राह्मण व शूद्र स्त्री यांचा विवाह जरी शास्त्रविहित असला तरी लौकिकात त्याची निंदा होते."[7] असे म्हटले आहे.

श्राद्ध हे देखील एक प्रकारचे दान म्हणून सांगितले आहे. मृताच्या पारलौकिक हिताच्या दृष्टीने श्राद्धाला महत्त्व दिले जाते. श्राद्ध म्हणजे खाण्यास योग्य असलेल्या पदार्थांचा किंवा त्यांच्यासाठी द्यावयाच्या द्रव्याचा मृत मनुष्यास उद्देशून श्रद्धेने त्याग करणे. श्राद्धे ही विविध प्रकारची आहेत. त्यापैकी एकोद्दिष्ट व पार्वण ही विशेष उल्लेखनीय आहेत. पिता, पितामह व प्रपितामह व मातुःप्रपितामह अश तीन पितरांस उद्देशून जे श्राद्ध केले जाते, त्यास पार्वण असे म्हणतात, हे एकेका पितरांस उद्देशून जे श्राद्ध केले जाते ते एकोद्दिष्ट होय.

मृत्यूनंतर एक वर्षाने किंवा मृत्यूपासून बाराव्या दिवशी करावयाच्या श्राद्धविधीला "सापिंडीकरण" असे म्हणतात. मातेचे हे करावे, असे सांगितले आहे.

श्राद्धासंबंधी चर्चा करीत असताना श्राद्धाच्या अक्षय फलप्राप्तीचे जे हेतू[8] सांगितले आहेत. त्यामध्ये भगिनीपुत्र, कन्येचा पुत्र, मातामहादि बांधव, मातेची सेवा करणारे ब्राह्मण यांचा समावेश केला आहे. अर्थात या ब्राह्मणांच्या योगे केलेले श्राद्ध उत्तम व अक्षय फल देणारे म्हणून वर्णन केले आहे.

श्राद्धासाठी काही विशिष्ठ ब्राह्मण टाळावेत[9] किंवा वर्ज्य म्हणून सांगितले आहेत. त्यामध्ये पुनर्भूचा पुत्र, ख-या किंवा खोटया दोषांनी कन्येला दूषित करणारा, कारणाशिवाय माता, पिता व गुरु यांचा व त्याप्रमाणे भार्यापुत्रादिकांचा त्याग करणारा, पुनर्भूचा पती अशाप्रकारचे ब्राह्मण हे श्राद्ध करण्यास योग्य नसल्याचे म्हटले आहे.

श्राद्धकर्म हे कुतपमुहूर्तावर सुरु केले जाते आणि त्या मुहूर्तापासून संपविणे श्रेयस्कर मानले जाते. दोन घटिका म्हणजे एक मुहूर्त. दिनमानाचे पंधरा भाग केले असता त्यातील आठवा भाग कुतपमुहूर्त होय. कुतप हा पापाचा नाश करणारा आहे. श्राद्धप्रसंगी मध्याह्न , खड्गपात्र, शाल रुपे, दर्भ, तिल, गाय या सात कुतपांबरोबरच कन्यापुत्र[10] हा आठवा कुतप असल्याचे सांगितले आहे. याचा अर्थ इतर गोष्टींबरोबर श्राद्धप्रसंगी कन्यापुत्राला पवित्र मानले आहे.

श्राद्धविधिप्रसंगी दान इ.क्रिया केल्यानंतर "मातामहादिकांस उद्देशून स्वधाकार म्हणावा"[11] असे म्हटले आहे.

प्रायश्चित्ताचा अधिकार :-

काही कर्मे दृष्ट फलाची साधने असतात व काही अदृष्ट फलाची साधने असतात. कार्ये ही निर्विघ्नपणे पार पडावीत व त्यांनी दोन्ही प्रकारच्या फलांचे साधन व्हावे, या हेतूने गणपतिकल्प प्रकरणामध्ये विनायकाविषयी माहिती दिली आहे.

या प्रकरणामध्ये विघ्नेश्वराने विघ्ने निर्माण केल्याची प्रत्यक्ष चिन्हे सांगितली आहेत. या ठिकाणी कुमारिकेस योग्य वर न मिळणे गर्भवतीस अपत्य न होणे, ऋतुमती स्त्रीने गर्भधारणा न करणे, इ.चा उल्लेख आला आहे.[12] ही विघ्ने नाहीशी करण्यासाठी अभिषेक, पुण्याहवाचन, स्वस्तिवाचन इ.कर्मे सांगितली आहेत. "स्वस्तिवाचन झाल्यानंतर ज्यांचा पती व पुत्र जिवंत आहेत अशा रुपगुणयुक्त व उत्तम वेश धारण करणा-या स्त्रियांनी ज्यास मंगल केले आहे अशा यजमानास पूर्व दिशेस असलेला कलश घेऊन "सहस्त्राक्षं" इ.मंत्राने गुरुने अभिषेक करावा असे म्हटले आहे.[13]

व्यवहारपद :-

राजाच्या कर्तव्याच्या न्यायदान या वर्णनप्रसंगी "व्यवहारपद" याचा उल्लेख आढळतो. व्यवहारपदाचा अर्थ वादाचा मुद्दा किंवा विषय. मनुस्मृतीत ऋणादान,

साहस, स्त्रीसंग्रहण, स्तेय, दंडपारुष्य इ·अठरा भेद उल्लेखिले आहेत· मिताक्षरेनेही हे सांगितले आहे· प्रस्तुत ठिकाणी केवळ सामाजिक अधिकाराच्या संदर्भात स्त्री विषयक व्यवहाराच्या संबंधित भागाचा विचार करणार आहे· आर्थिक बाबी व स्त्री संग्रहणाचा विचार अन्य प्रकरणात करणार आहे·

साक्षीचा अधिकार :-

साक्षी हे एक प्रमाण म्हणून मानले आहे· साक्षी एखादी गोष्ट साक्षात् पाहिल्याने किंवा ऐकल्याने होते· जेव्हा दोन व्यक्तिंमध्ये वाद उत्पन्न होतो आणि त्या दोघांपैकी खरा कोणता ह्याविषयी संशय उत्पन्न होतो· तेव्हा या वादातील सत्याचा निर्णय साक्षीदारांच्या सहाय्याने होतो, असे गौतम इ·सांगितले आहे·

साक्षी कसे असावेत[14] हे सांगून झाल्यावर मनुवचनाचा उल्लेख केला आहे· "स्त्रीणां साक्ष्यं स्त्रियः कुर्युः। वरील लक्षणांनी युक्त स्त्रियांचे ही स्त्री साक्षीच असावेत असे म्हटले आहे· म्हणजेच स्त्रियांच्या वादात स्त्रिया साक्षीदार असल्यास याला मनूने मान्यता दिली आहे·

यानंतरच्या श्लोकामध्ये याज्ञवल्क्याने असाक्षी अर्थात अपात्र साक्षीदार कोणते ते सांगितले आहेत· त्यामध्ये बालक, वृद्ध, जुगारी इ·बरोबरच "स्त्री ही साक्षी होऊ शकत नाही" असे म्हटले आहे· या ठिकाणी केवळ याज्ञवल्क्यानेच नव्हे तर शास्त्रकारांनी देखील स्त्रीला साक्षीचा अधिकार नाही असे सांगितले आहे· शास्त्रकारांनी साक्षीदार कसा असावा त्याबद्दल सांगितले आहे - ज्या घटनेविषयी साक्ष द्यायची असेल ती घटना त्याने प्रत्यक्ष पाहणे किंवा ऐकणे आवश्यक आहे· त्या घटनेचे योग्य आकलन करण्याची त्याची कुवत असली पाहिजे· यानंतर ती घटना सत्य स्वरूपात न्यायाधिशासमोर सांगण्याची इच्छा व कुवत असली पाहिजे· याशिवाय वरच्या श्लोकामध्ये सांगितल्याप्रमाणे तो पुण्यवान इ·गुणांनी युक्त असला पाहिजे· शास्त्रकारांनी स्त्रिया या अपेक्षा पूर्ण करू शकत नसल्याने त्यांना साक्षीचा अधिकार दिलेला नाही· मनुने याचे कारण "स्त्रिया अस्थिर बुद्धीच्या असतात" असे दिले आहे·

अपरार्क टीकेतही "स्त्रीबालादयः असाक्षिणः" असा उल्लेख आला आहे· मिताक्षरेमध्ये मनुवचनाचा "स्त्रीणां साक्ष्यं स्त्रियां: कुर्याः" उल्लेख आढळतो· या नियमाचे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

स्पष्टीकरण करताना मेधातिथीने म्हटले आहे "जेथे वादी व प्रतिवादी पुरुष असतात. तेथे स्त्रियांची साक्ष चालणार नाही. परंतु जेथे स्त्री बरोबर पुरुषाचा वा स्त्रियांचा आपापसातील छोटासा व्यवहार असेल, तेथे स्त्रिया साक्षीदार होऊ शकतातच. शिवाय व्यवहारात स्त्रियांनाच साक्ष द्यावी आणि पुरुषांनी देऊ नये, असा काही नियम नाही. फक्त स्त्रियांच्या व्यवहारात क्वचित प्रसंगीच स्त्रियांची साक्ष चालेल. कारण त्यांची बुद्धी अस्थिर असते, असे सांगण्यात आले आहे. काही स्त्रिया मात्र ब्रह्मवादिनींप्रमाणे सत्यवादिनी व स्थिर बुद्धीच्या असतात."

"स्त्री साक्षी होऊ शकत नाही" या याज्ञवल्क्याच्या नियमावर शास्त्रवचनांचा प्रभाव दिसतो. स्त्री-पुरुष संबंधाचा विचार करीत याज्ञवल्क्यस्मृतीने स्त्रियांचा अधिकार नाकारुन त्यांच्यावर अन्याय केला आहे. सद्यस्थितीत मात्र न्यायालयामध्ये स्त्रीसाक्ष ग्राह्य मानली जाते.

दिव्य :-

याज्ञवल्क्यस्मृतीने दिव्याबाबत सर्वसाधारण नियम[15] असा सांगितला आहे, की साक्षीदार, लेख, भुक्ती इ. मानवी पुरावा अथवा परिस्थितीजन्य पुरावा उपलब्ध नसेल तेव्हा दिव्याचा उपयोग करावा. "तुलाग्न्यापो विषं कोशो दिव्यानीह विशुद्धये।" तुला, अग्नी, जल, विष, कोश ही पाच दिव्ये शुद्धिसाठी म्हणजे संदिग्ध अर्थातील संदेह दूर होण्यासाठी सांगितली आहेत.

याज्ञवल्क्यस्मृतीने स्त्रियांसाठी तुला दिव्य सांगितले आहे. "जाती वयोवस्था इ. विशेषांकडे न पाहता सामान्यतः कोणत्याही स्त्रीच्या शोधनार्थ तुला दिव्याचा उपयोग करावा"[16] असे म्हटले आहे. या तुला दिव्याचा प्रयोग कसा करावा यासंबंधी सांगितले आहे- तुलाधारणेच्या प्रसंगी घटाच्या एका पारडयात त्याच्या भारंभार माती, दगड वगैरे घालून तोलले जाते. ज्या पारडयात ज्याला बसविले असेल त्यात खुणेसाठी रेषा ओढली जाते. घटाची मंत्राने प्रार्थना केली जाते. तुला खाली गेली असता ती व्यक्ती अपराधी आणि वर गेली असता ती निरपराधी समजली जात असे. याप्रमाणे तुला दिव्य करीत असत.

मेधातिथीने मनुस्मृतीवरील (8.116) टीकेत म्हटले आहे- "काही बाबतीत दिव्ये निरुपयोगी ठरण्याचा संभव असतो. परंतु तेवढयावरुन दिव्यांची उपयुक्तता

नष्ट करता येत नाही· कारण दिव्ये निष्फळ झाल्याचे उदाहरण फार वेळा घडत नाही· प्रत्यक्ष आणि अनुमान ह्या गोष्टींवरून कित्येक वेळा निश्चित निर्णय होत नाही, तरी त्यांच्यावर विश्वास ठेवू नये, असे कोणी प्रतिपादन करीत नाही· दिव्याचा निर्णय चुकीचा ठरेल तर तो दिव्य करणाऱ्याच्या पूर्वजन्मार्जित कर्माचा विपाक समजावा·"

बहुतेक प्राचीन देशात न्यायनिर्णयाच्या कामी दिव्यांचा उपयोग करण्यात येत असे· इंग्लंडमध्ये इ·स·1215 मध्ये दिव्यावर बंदी घालण्यात आली· आपल्या देशात 18 व्या शतकाच्या अखेरपर्यंत न्यायनिर्णयासाठी दिव्ये केल्याचे उल्लेख आढळतात·[17]

स्मृतिकाळामध्ये अपराध्याला त्याच्या वाईट कृत्याबद्दल भीती वाटावी समाजातील अशा वृत्तींना आळा बसावा या उद्देशाने याज्ञवल्क्यस्मृतीने हे उपाय सांगितलेले दिसतात· स्त्रियांसाठी या ठिकाणी तुला दिव्य सांगितले आहे·

तथापि हल्ली एखाद्या गुन्हयासाठी अशा प्रकारचे दिव्य कोणी केल्याचे दिसत नाही किंवा ऐकण्यातही नाही· दिव्यावरून ती व्यक्ती दोषी किंवा निर्दोषी आहे हे अनुमान काढणे योग्य नाही· मेधातिथीचे मत देखील पटत नाही· एखाद्या वेळेस न्यायदानप्रसंगी निर्दोष व्यक्ती दोषी किंवा याउलट घडण्याचा संभव आहे·

<u>दत्तप्रदानिक-दान</u> :-

दान हे एक व्यवहारपद सांगितले आहे· विहित आणि अविहित मार्गाचा आश्रय केल्यामुळे "दत्तानपाकर्म" व दत्ताप्रदानिक" या दानाला दोन नावे प्राप्त झाली आहेत· दान व्यवहारपद देय, अदेय, दत्त व अदत्त असे चार प्रकारचे आहे, जे अनिषिद्ध दानक्रियेस योग्य असते ते देय; स्वतःचे नसल्यामुळे अथवा शास्त्राने निषेध केलेला असल्यामुळे जे देण्यासारखे नसते ते अदेय· दत्त प्रदानिकरप्रकरणामध्ये (2·12) अगदी प्रारंभीच देय आणि अदेय गोष्टी कोणत्या याविषयी सांगितले आहे·[18]

याज्ञवल्क्यस्मृती म्हणते- "स्वं कुटुंबाविरोधेन देयं दारसुतादृते।" याचा अर्थ असा की- "सर्व कुटुंबाशी विरोध न येईल अशा रीतीने, स्त्री-पुत्र यांना सोडून बाकीचे धन द्यावे·

आपल्या कुटुंबाचे पालनपोषण व्यवस्थितरीत्या करणे हे कुटुंबप्रमुखाचे कर्तव्य आहे आणि ते त्याने पूर्ण केले पाहिजे· कुटुंबपोषण करून राहिलेले धन मात्र देय

म्हणून सांगितले आहे· या ठिकाणी असणा-या "कुटुंबाविरोधेन" या शब्दाने कुटुंबाच्या पोषणास प्रतिबंध करणारे धन हे अदेय म्हणून सांगितले आहे· मनूने देखील "वृद्धौ च मातापितरौ" §8·35§ यामध्ये- वृद्ध, आई, वडील, साध्वी पत्नी व लहान पुत्र यांचे शंभर अकृत्य करूनही पोषण करावे असे म्हटले आहे· नारदाने देखील पुत्र व स्त्री हे अदेय असल्याचे म्हटले आहे·

या ठिकाणी देखील याज्ञवल्क्यस्मृतीने स्त्री व पुत्र या गोष्टी अदेय म्हणून सांगितल्या आहेत· अर्थात स्त्री वर पुरुषाची मालकी असली तरी देखील आपली स्त्री ही दान म्हणून किंवा दुस-याला देता येत नाही असे या नियमामध्ये सांगितले आहे· त्याचे हे मत उल्लेखनीय आहे· पुरुषाचे स्त्रीवर स्वामित्व असले तरी ते एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच| दान म्हणून तिचा व्यवहार पुरुषाला करता येणार नाही·

<u>वाक्यपारुष्य</u> :-

याज्ञवल्क्यस्मृतीमध्ये याबाबतचे विचार आले आहेत· नारदाने याची व्याख्या अशी दिली आहे- ज्या अपमानास्पद शब्दांनी एखाद्या मनुष्याची, देशाची, जातीची, कुळाची आणि त्यांच्यासारख्या दुस-या गोष्टींची निंदा जाहीर केली जाते आणि ज्यांच्यापासून दुस-या मनुष्याच्या मनाला दुःख होते अथवा त्याला राग येतो अशा शब्दांना वाक्यपारुष्य म्हटले जाते·" नारदाने देशाक्रोश, जात्याक्रोश, कुलाक्षेप याशिवाय साक्षेप, अश्लील व तीव्र असे वाक्यपारुष्याचे प्रकार सांगितले आहेत· स्त्रीविषयक वाक्यपारुष्यासबंधी खालील उल्लेख या प्रकरणामध्ये आढळतात·

अश्लील आक्षेपाचा दंड सांगताना म्हटले आहे- " तुझ्या भगिनीशी अथवा मातेशी मी अभिगमन करेन अशा शिव्या देणा-या पुरुषाला राजाने पंचवीस पण दंड करावा·" त्याच्याच शब्दात सांगावयाचे झाल्यास-

"अभिगन्तास्मि भगिनीं मातरं वा तवेतिह।
शपन्तं दापयेद्राजा पञ्चविंशतिकं दमम।।"[19]

त्याचप्रमाणे- "अर्द्धोऽधमेषु द्विगुणः परस्त्रीजूत्तमेषु च।" म्हणजे दुस-यांच्या भार्याविषयी आक्षेप करणारांस द्विगुण म्हणजे पन्नास पण दंड सांगितला आहे· "आक्षेप" याचा अर्थ प्रस्तुत ठिकाणी शिवीगाळ असा आहे·

एकमेकांनी कोणीही वाटेल तसे कठोर, निंद्य बोलू नये, यातून कटुता, द्वेष निर्माण होऊन समाजातील व्यक्तिंचे अंतर्गत संबंध बिघडू नयेत, एकमेकांच्यामध्ये सलोख्याचे वातावरण रहावे, याकरीता वाक्यपारुष्याचा याज्ञवल्क्याने विचार करून त्यासाठी दंडयोजना सांगितली आहे.

<u>साहस :-</u>

"साहस" या नावाच्या विवादपदाची चर्चा याज्ञवल्क्याने केली आहे. साहस म्हणजे काय याबद्दल सांगताना तो म्हणतो-[20]

"सामान्यद्रव्यप्रसभहरणात्साहसं स्मृतम्।"

मिताक्षरात म्हटले आहे- "ज्याच्यावर अनेकांचे स्वामित्व आहे अशा द्रव्याचा कोणा एखाद्यालाच स्वेच्छेने विनियोग करता येत नाही, अशा द्रव्याचे किंवा परकीय धनाचे अपहरण करणे याला साहस म्हणतात. बलाच्या आश्रयाने हरण केल्यामुळे त्याला साहस असे म्हटले जाते. उदाहरणार्थ- परस्त्रीचा अपमान करणे इ."

नारदाने साहसाची व्याख्या अशी केली आहे-
"बलाच्या योगाने दर्पित झालेल्या लोकांकडून जे कर्म केले जाते, त्याला साहस म्हणतात. हे साहस प्रथम, मध्यम आणि उत्तम असे तीन प्रकारचे आहे. या प्रत्येक साहसासाठी विशिष्ठ पण दंड सांगितला आहे. प्रथम साहसाला कमीतकमी शंभर, मध्यम साहसाला पाचशे व उत्तमाला सहस्त्र दंड सांगितला आहे.

विशेष प्रकारच्या साहसाविषयी सांगत असताना- "जो भ्रात्याच्या भार्येला ताडन करतो त्याला पन्नास पण दंड सांगितला आहे.[21]

"स्वच्छंदपणे म्हणजे जो नियोगाशिवाय विधवेशी गमन करतो, दासीच्या गर्भाला पाडविणारा यांना; त्याचप्रमाणे बहीण-भाऊ, पती-पत्नी जे कोणी पतित न झालेल्या अर्थात अतिशुद्ध अशा परस्परांना सोडतात. त्यातील प्रत्येकाला शंभर पण दंड करावा असे म्हटले आहे.[22]

सामाजिकदृष्टया नियमांचे उल्लंघन करून अस्थिरता निर्माण होऊन कोणी "साहस" करू नये यासाठी याज्ञवल्क्याने दंड किंवा शिक्षा या स्वरूपात हे नियम केले आहेत. तत्कालीन न्यायदानाची कल्पना अशाप्रकारच्या नियमांमधून आपल्याला

पाहावयास मिळते· या साहसाप्रमाणेच पुढे स्तेयविषयक चर्चा केली आहे·

**स्तेय :-**

"द्रव्याचे रक्षक, राजाध्यक्ष इतयादींच्या समक्ष व बलाचा आश्रय करून ज़े परधन हरण केले जाते त्याला यापूर्वी याज्ञवल्क्याने साहस असे म्हटले आहे· परंतु याच्या उलट प्रकाराने म्हणजे द्रव्यरक्षक इ·च्या नकळत, फसवून ज़े परधन हरण क़ेले जाते त्याला स्तेय असे म्हटले आहे·"[23] आपण स्तेयाला चोरी असे म्हणतो· याची चर्चा याज्ञवल्क्याने क़ेली आहे· कोणत्याही दंड इ·बाबत क़ेवळ पुरूष किंवा क़ेवळ स्त्रीच दोषी न• मानता त्यांच्या दोषानुसार त्यांना दंड सांगितला आहे· प्रस्तुत ठिकाणी स्त्री संबंधित स्तेय विचार फक्त घेतले आहेत·

क्षुद्र, मध्यमप्रतीच्या व उत्तमप्रतीच्या द्रव्याचे हरण केले असता, त्या-त्या द्रव्याच्या मूल्यानुसार दंड सांगितला आहे· सोने, रत्ने, रेशमी वस्त्र इ·च्या बरोबर स्त्रियांचा समावेश उत्तम द्रव्यामध्ये क़ेला आहे· या उत्तम द्रव्याच्या स्तेयाबद्दल उत्तमसाहसरूप दंड करावा असे म्हटले आहे·[24] मनुस्मृतीमध्ये[25] म्हटले आहे- "कुलीन स्त्रियांचा अपहार करणा-याचा वध करावा, स्त्रीचा अपराध क़ेला असता, सर्वस्व दंड करावा व कन्येचे हरण करणा-यास वध दंड करावा·"

गर्भपात करणा-याला उत्तम साहस दंड सांगितला आहे· दासीगर्भाचा विनाश केल्यास शंभर पण दंड, ब्राह्मणगर्भाविषयी" "हत्वा गर्भमविज्ञातं" या वचनाने ब्रह्महत्या-दोष सांगितला आहे· पुरूष व स्त्री यांचा वध केला असता शील, वृत्त इ·च्या अपेक्षेने उत्तम किंवा अधम दंड व्यवस्थित करावा" असे म्हटले आहे·

"विप्रदृष्टां स्त्रियं चैव पुरूषघ्नीमगर्भिणीम्।
सेतुभेदकरीं चाप्सु शिलां बध्वा प्रवेशयेत्।।"

"विशेषप्रकारे अतिशय दुष्ट झालेली, भ्रूणहत्या करणारी, आपल्या गर्भाचा पात करणारी, पुरूषास मारणारी, सेतू म्हणजे धरणे बांध यांना तोडणारी इतक्या प्रकारच्या गर्भरहित स्त्रियांच्या गळयात शिळा बांधून त्यांना जलात बुडवावे, म्हणज़े त्या पुनः वर येऊ शकणार नाहीत·"[26]

"विषाग्निदां पतिगुरुनिजापत्यप्रमापणीम्।

विकर्णकरनासौष्ठीं कृत्वा गोभिः प्रमापयेत्।।"

"जी दुस-याला मारण्यासाठी अन्न-पानादिकांत विष घालते, जी जाळण्यासाठी ग्रामादिकांस अग्नी लावते, जी आपला पती, गुरू व अपत्ये यांस मारते, ती गर्भिणी नसल्यास तिचे कान, हात, नाक व ओठ कापून व तिला दुष्ट बैल जुंपलेल्या गाडीत बसवून गाडीत अस्ताव्यस्त टाकून मारवावी."[27]

वरील नियमांमध्ये दुस-याच्या मृत्यूला कारणीभूत होणा-या इ. दोषी स्त्रीसाठी यातना देऊन मग मृत्यूची शिक्षा सांगितली आहे. तथापि या ठिकाणी याज्ञवल्क्याने दयाळू बुद्धी दाखविली आहे की शिक्षेस पात्र असणारी स्त्री ही गर्भवती नसावी.

आतापर्यंत साहस इ. स्त्री संबंधित बाबी पाहिल्यानंतर तिचे महत्त्व, सन्मान देणा-या अवशिष्ठ बाबी खाली लक्षात घ्यावयाच्या आहेत.-

याज्ञवल्क्यस्मृती म्हणते- "माता, भगिनी, भावजय इ. स्त्रिया मातेकडील नातेवाईक इ. शी वाक्कलह सोडल्याने प्राजापत्य इ. सर्व लोकांची प्राप्ती होते."[28]

दान प्रकरणामध्ये सत्पात्राचे लक्षण सांगितल्यावर त्याच्या विवेचनप्रसंगी खालील गोष्टींचा उल्लेख आढळतो.- स्त्रियांवर क्रोध न करणारे ब्राह्मण दात्यास तारण्यास समर्थ होतात, माता, पिता, भाऊ, बहीण, बहिणीची मुले, स्त्री, पुत्र, कन्या इ. माणसे गुणहीन व विद्याहीन असली तरी त्यांना यथाशक्ती दान देणे हे उत्तम कर्म म्हणून सांगितले आहे, पित्यास दिलेले दान शतपट, मातेस दिलेले सहस्त्रपट व कन्येस दिलेले अनंतपट फल देते, कन्येचा पुत्र, जामाता, भगिनीपुत्र व बंधू मूर्ख असले तरी त्यांचा त्याग करू नये.[29]

## सन्मान :-

कोणत्या दानामुळे दाता स्वर्गलोकी पूज्य होतो हे सांगत असता मिताक्षरासारा-मध्ये "नैवेशिकं" म्हणजे "गृहस्थधमार्थ कन्या" असा अर्थ घेऊन अशा कन्यादानाचे पुण्य दात्यासाठी सांगितले आहे. तथापि श्लोकाच्या खाली विवेचन करत असता म्हटले आहे, की "नैवेशिकं" या शब्दाचा शास्त्रीय अर्थ ज्यास माता, पिता व आप्त नाहीत अशा अनाथ बालकाचे पोषण करून, त्याचे सर्व संस्कार करून, त्यास विद्या इ. निर्वाहाची

पुरूषार्थाची साधने शिकवून व त्याचा विवाह करून त्यास राहावयास घर इ·देणे असा आहे·

अपरार्कादि टिकेत "निवेशार्थं कन्यादि दीयत इति नैवेशिकम्।" असे म्हटले आहे· तर दीपकलिकेत"नैवेशिकं विवाहार्थं द्रव्यम्" असे म्हटले आहे·

अर्थात प्रस्तुत ठिकाणी "गृहस्थधर्मार्थ कन्या" असा अर्थ घेतल्यास "कन्यादान" हे पवित्र दान मानले आहे· केवळ पुत्र हाच परलोकी उद्वार करतो, असे नव्हे, तर कन्या ही पतिकुलामध्ये म्हणजे दुस-याच्या घरी जाऊनही अप्रत्यक्षपणे पित्याला परलोकी पुण्य प्राप्त करून देते, असे याविषयी म्हणता येते·

ज्या नऊ वस्तू "अदेय" म्हणजे दान न देता येण्यासारख्या आहेत, असे मिताक्षरासारात म्हटले आहे, त्यामध्ये स्त्री व स्त्रीधनाचा समावेश केला आहे, वेदविक्रय करून व स्त्रियांस विकून मिळविलेले धन आणि नपुंसकाकडून मिळविलेले धन देवपितृकार्यात देऊ नये; गाय, गृह, शय्या व स्त्री यांचे दान एकेक ब्राह्मणासच द्यावे म्हणजे एक वस्तू अनेकास उद्देशून देऊ नये कारण त्यांचा विभाग करता येत नसल्याचे म्हटले आहे·

एकंदरीत स्त्री किंवा स्त्रीधनासारख्या गोष्टी दान केल्या असता दानाचे पुण्य लागण्याऐवजी अपुण्यप्राप्तीच होईल, असे येथे सांगितले आहे·

"न मागता आणून दिलेले पदार्थ हे दुष्कर्म करणा-यांपासूनही घ्यावे· परंतु कुलटा म्हणजे व्यभिचारिणी स्त्री पासून केव्हाही घेऊ नये·[30]

प्रस्तुत नियमामध्ये व्यभिचारिणी स्त्रीकडून दानाचा स्वीकार करू नये असे सांगितले आहे·

स्त्री अवध्य :-

राजधर्मप्रकरणामध्ये राजाच्या कर्तव्य इ·विषयीचे विवेचन केले आहे· राजाने युद्धभूमीवर कोणाला मारू नये हे सांगत असता श्लोकातील "आदि" शब्दाचे स्पष्टीकरण गौतम, शंखाने सांगितल्याप्रमाणे "स्त्री युद्धात अवध्य आहे"[31] असे दिले आहे·

राजाचा दिनक्रम सांगत असताना म्हटले आहे की, "राजाने अपराह्नकाली आपल्या इच्छेप्रमाणे अंतःपुरात विहार करावा किंवा कलाकुशल व विश्वासू मंत्र्याबरोबर व रूप, यौवन, चातुर्य इ·गुणांनी युक्त स्त्रियांसह विनोदाच्या गोष्टी सांगाव्यात[32] असे मिताक्षरा-

सारात म्हटले आहे अर्थात राजाने आपले मनोरंजन स्त्रियांसमवेत करावे असे सांगितले आहे·

## जबाबदारी :-

बलात्कार करणा-या किंवा परस्त्रीचे अपहरण करणा-यांपासून प्रजेचे रक्षण करण्याची जबाबदारी राजावर सोपविली आहे·[33]

राजमंडलाविषयी माहिती देत असताना मिताक्षरासारात भगिनीपुत्र, आत्याचा पुत्र, मावशीचा पुत्र हे "सहजमित्र" सांगितले आहेत·[34]

"दुर्वृत्तेषु दण्डं निपायेत्।" हे सांगत असताना मिताक्षरेत परस्त्रीचा अपहार करणा-यांसाठी राजाने दंडाचा उपयोग करावा[35] असे सांगितले आहे·

एकंदरीत राजाची कर्तव्य सांगत असताना स्त्री हा प्रजेतील महत्त्वाचा घटक असल्याने तिच्या रक्षण इ·विषयीची दखल याज्ञवल्क्यस्मृतीने घेतल्याचे लक्षात येते·

## धार्मिक कृत्यातील सहभाग :-

जर एखाद्या पुरुषास अनेक स्त्रिया असतील तर त्या स्त्रियांपैकी धर्मकार्यामध्ये कोणाला अग्रमान द्यावयाचा याविषयी म्हटले आहे-[26] "सवर्ण स्त्री असताना असवर्ण स्त्रीस धर्मकार्यात योजू नये· पण सवर्ण म्हणजे आपल्याच जातीच्या अनेक स्त्रिया असल्यास धर्मकृत्यात ज्येष्ठ स्त्री शिवाय मध्यम, कनिष्ठ इ·स्त्रियांस योजू नये, तर तिच्यासह त्यांच्याकडून धर्मकृत्ये करावीत·"

वरील नियमाचा अर्थ स्पष्ट आहे की, जर सर्व स्त्रिया एकाच जातीच्या असतील तर जिचा विवाह प्रथम झाला असेल तिने सर्व धर्मकृत्यात पतीबरोबर भाग घ्यावा किंवा तिला तसा अग्रमान द्यावा आणि इतर मध्यम, कनिष्ठ इ·स्त्रियांनी ज्येष्ठ स्त्रीसह धर्मकृत्ये करावीत·

धर्मकार्यप्रसंगी याज्ञवल्क्यस्मृतीने सवर्ण आणि त्यामध्ये जेष्ठ असलेल्या स्त्रीला मानाचे स्थान दिले आहे· इतर सवर्ण स्त्रियांनाही धार्मिक कृत्ये करण्याची परवानगी दिली आहे· तथापि ज्येष्ठ पत्नीच्या मानाने त्यांना गौण स्थान दिले आहे· असवर्ण स्त्रीचा धार्मिक कार्याबाबतीतील अधिकार काढून याज्ञवल्क्यस्मृतीने त्यांच्यावर अन्याय

केला आहे· सध्या एकभार्या पद्धती अस्तित्वात असल्याने हा नियम कालबाह्य वाटतो·

## सारांश :-

स्मृती ग्रंथांनी समाजातील विविध घटकांच्या हक्कांविषयी, कर्तव्यांविषयी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत· याज्ञवल्क्यस्मृतीने "स्त्री" घटकाच्या सामाजिक अधिकाराबाबत आणि धार्मिक नियम इ·बाबत आपली मते व्यक्त केली आहेत· याप्रसंगी छोटया बाबींचाही तपशीलाने विचार केलेला दिसतो·

1· गृहस्थाने स्ववासिनी कन्या, गर्भवती स्त्री यांना व्यवस्थित भोजन द्यावे, माता व मातृसंबंधी बांधवांचे भोजनाच्याद्वारे आदरातिथ्य करावे, स्त्रीला रस्त्यामध्ये जाण्यासाठी मार्ग द्यावा इ· स्त्रीबाबत आदर दाखविणारे नियम सांगितले आहेत·

2· श्राद्धप्रसंगी मातेचे सपिंडीकरण करावे, मातामहादिकांस उद्देशून स्वधाकार म्हणावा असे म्हटले आहे· श्राद्धाच्या अक्षय फल प्राप्तीचे हेतू सांगत असता, माता इ·ची सेवा करणारे ब्राह्मण श्राद्धविधी करण्यास योग्य तर, पुनर्भू पुत्र इ· ब्राह्मण अयोग्य म्हणून वर्णन केले आहेत·

3· न्यायालयामध्ये "स्त्री" साक्षी होत नसल्याचे याज्ञवल्क्यस्मृतीने प्रतिपादन केल्याने स्त्री जातीवर मोठा अन्याय केला आहे·

4· दिव्याच्या वर्णनप्रसंगी स्त्रियांसाठी तुला दिव्य सांगितले आहे·

5· दत्तप्रदानिक प्रकरणामध्ये स्त्री ही अदेय आहे· म्हणजे तिच्यावर पुरुषाचे स्वामित्त्व असले तरी दानाच्या स्वरूपात तिचा व्यवहार करता येत नाही, असा महत्त्वपूर्ण मुद्दा याज्ञवल्क्यस्मृतीने मांडला आहे·

6· वाक्यपारुष्य चर्चेप्रसंगी स्त्रीवाचक अश्लील बोलणा-यास दंडयोजना सांगितली आहे·

7· पत्नीला मारणे, नियोगाशिवाय विधवेशी गमन करणे, दासीगर्भाची हत्या इ·स्त्री अत्याचाराला साहस मानून त्यासाठी प्रथम, मध्यम, उत्तम या स्वरूपात दंडयोजना सांगितली आहे· यावरुन आपल्याला तत्कालीन न्यायव्यवस्थेची कल्पना येते·

8· स्त्रीचा समावेश उत्तम द्रव्यामध्ये करून, या स्तेयाबद्दल उत्तम साहस रुपात दंड सांगितला आहे· गर्भपात, स्त्रीवध हे करणा-या पुरुषासाठी दंडयोजना

सांगितली आहे. तद्वतच दोषी असलेल्या स्त्रीला देखील यातनादायक मृत्युदंड सांगितला आहे. तथापि गर्भवती स्त्रीबाबत मात्र या शिक्षेत सूट देऊन सहानुभूतीचा दृष्टिकोण स्वीकारलेला दिसतो.

9. गुणहीन व विद्याहीन माता, भगिनी इ.ना यथाशक्ती दान देणे हे उत्तम कर्म मानले आहे. कन्यादान हे पवित्र मानून केवळ पुत्रच पित्याचा उद्धार करतो असे नव्हे, तर कन्या पतिकुळात राहूनही पित्याचा उद्धार करू शकते ही महत्त्वाची बाब या ठिकाणी सांगितलेली आहे.

स्त्री किंवा स्त्रीधनासारख्या गोष्टींच्या दानाने पुण्यप्राप्ती होण्याऐवजी पाप प्राप्ती होत असल्याचे "अदेय" दानाच्या चर्चेतून ध्यानात येते.

10. धार्मिक कृत्यामध्ये याज्ञवल्क्याने ज्येष्ठ सवर्ण स्त्रीचा सहभाग महत्त्वपूर्ण मानल्याने असवर्ण व इतर सवर्ण स्त्रियांवर अन्याय झाल्याचे दिसते.

**संदर्भ :-**


1· या·स्मृ·1·5·105

2· या·स्मृ 1·5·108

3· या·स्मृ· 1·5·117

4· या·स्मृ· 1·5·121

5· या·स्मृ· 1·6·131

6· या·स्मृ 1·6·152

7· या·स्मृ·.1·6·156

8· या·स्मृ· 1·10·220

9· या·स्मृ· 1·10·223 व 224

10· या·स्मृ· 1·10·226

11· या·स्मृ· 1·10·244

12· या·स्मृ· 1·11·275

13· या·स्मृ· 1·11·281

14· या·स्मृ· 2·5·68 व 69

15· या·स्मृ· 2·2·22

16· या·स्मृ·मि·सार 2·7·98

17· एपि·इं·खण्ड 130 पान 291 ते 292

18· या·स्मृ·2·12·175

19· या·स्मृ·2·18·205

20· या·स्मृ· 2·20·230

21· या·स्मृ· 2·20·232 व 233

22· या·स्मृ· 2·234; 236; 237

23· या·स्मृ· 2·23

24· या·स्मृ· 2·23·275

25· मनुस्मृती 8·321 ते 323

26· या·स्मृ·मि·सार 2·23·278

27· या·स्मृ·मि·सार 2·23·279

28· या·स्मृ·1·6·157 व 158

29· या·स्मृ· 1·9·200

30· या·स्मृ· 1·9·215

31· या·स्मृ· 1·13·326

32· या·स्मृ· 1·13·329

33· या·स्मृ· 1·13·336

34· या·स्मृ· 1·13·345

35· या·स्मृ·1·13·354

36· या·स्मृ·1·88 वरील मिताक्षरा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR